प्रेसनोट

दिनांक ११/१२/२०२५

**१) राजेश तुकाराम कदम, पद– लिपीक (वर्ग –३), अतिक्रमण विभाग, वार्ड क्र. ०६, मिरा–भाईंदर मनपा ,जि. ठाणे २) सुहास गोविंद केणी पद– सफाई कामगार (वर्ग –४), अतिक्रमण विभाग, वार्ड क्र. ०६, मिरा–भाईंदर मनपा ,जि. ठाणे. ३) खाजगी इसम संजय भोला साव, यांचे विरुध्द लाचलुचपत विभागाकडून लाचेची रक्कम स्विकारलेबाबत सापळा कारवाईबाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | ठाणे |
| स्टे.डा.क्र. | :– | काशिगाव पोलीस स्टेशन, मिरा–भाईंदर वसई– विरार पोलीस आयुक्तालय दैनंदिनी क्रमांक ०३२/२०२५, वेळ १९:०७ दिनांक १०/१२/२०२५ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | १) श्री. राजेश तुकाराम कदम, वय ४३ वर्षे, पद– लिपीक (वर्ग –३), अतिक्रमण विभाग, वार्ड क्र. ०६, मिरा–भाईंदर मनपा ,जि. ठाणे<br>२) श्री. सुहास गोविंद केणी वय ५५ वर्षे,पद– सफाई कामगार (वर्ग –४), अतिक्रमण विभाग, वार्ड क्र. ०६, मिरा–भाईंदर मनपा ,जि. ठाणे.<br>३) खाजगी इसम संजय भोला साव, वय ४७ वर्षे |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | २०,०००/– रूपये तोडजोडअंती १६,०००/– रू. |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | १६,०००/– रूपये |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार यांनी सर्वे नं ७९ लक्ष्मी वेलफेयर सोसायटी, वरदान लोकआश्रम च्या जवळ चेने गाव, घोडबंदर रोड, काजुपाडा येथे राहण्यासाठी १० बाय २० चा पत्र्यांचा रूम बांधला होता. सदर रूम न तोडण्यासाठी तक्रारदार यांचेकडे आरोपी लोकसेवक १) श्री. राजेश तुकाराम कदम २) श्री. सुहास गोविंद केणी यांनी २५,०००/–रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम न दिल्यास तक्रारदार यांचा पत्र्यांचा रूम तोडण्यात येईल असे सांगितलेबाबत तक्रारदार यांनी दि. ०८/१२/२०२५ रोजी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०९/१२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान १) लोकसेवक राजेश तुकाराम कदम २) सुहास गोविंद केणी यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/– रुपये मागणी करून तोडजोडअंती १६,०००/–रू मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने दिनांक १०/१२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. सुहास गोविंद केणी यांचे सांगणेवरून खाजगी इसम संजय साव यांना तक्रारदार यांचेकडून चेना क्रिक बस स्टॉप समोर, सुरेखा हॉटेल जवळ, ठाणे घोडबंदर रोड येथे लाचेची रक्कम १६,०००/– रू. स्विकारतांना दि. १०/१२/२०२५ रोजी १५.२३ वा. रंगेहात पकडले असुन यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली आहे. तसेच लोकसेवक १) श्री. राजेश तुकाराम कदम २) श्री. सुहास गोविंद केणी यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि,भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्सॲप् क्रमांक – ९९३०९९७७००

(सचिन गोरे)
पोलीस निरीक्षक,
अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

पोलीस निरीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते
ठाणे

Scanned with OKEN Scanner